# सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/प्रवेशक्षमता वाढ/घट/२०१२/ 283
दिनांक 08/02/2012

**प्रति,**

**प्राचार्य,**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती.
संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव.
हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे पी.जी. डिपार्टमेन्ट ऑफ काम्प्युटर सायन्स ॲण्ड टेक्नालॉजी, अमरावती.
सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नालॉजी, अमरावती.
जवाहरलाल दर्डा इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नालॉजी, यवतमाळ.
सन्मती इंजिनिअरींग कॉलेज सावरगांव बर्डे, वाशिम.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सध्या सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ / घट करण्याच्या प्रस्तावाबाबत.**

**संदर्भ :-** तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/प्रवेशक्षमता वाढ / घट / २०१२ /निरंक, दिनांक निरंक.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सध्या सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ / घट व व्दितीय पाळी करण्याच्या प्रस्तावाबाबतचे संदर्भिय पत्र सोबत जोडलेले आहे. सदर पत्रामध्ये दिलेल्या सुचना व निर्देशानुसार आपल्या संस्थेच्या प्रस्तावाबाबतची कार्यवाही पार पाडावी. तसेच सादर केलेल्या प्रस्तावाची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

तसेच दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सुनावणीस उपस्थित रहावे.

**सहपत्रे :-** वरीलप्रमाणे.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळी टाकण्याकरीता.

E:\All Letters Manish.doc



Created with nitro PDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक - २/एनजीसी/प्रवेशक्षमता वाढ/घट/२०१२/
दिनांक :

प्रति
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
औरंगाबाद/अमरावती/नागपूर

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सध्या सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्याच्या प्रस्तावाबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, सध्या अस्तित्वात असलेल्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, पदवी अभ्यासक्रम व एमबीए/एमएमएस/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता बदल करण्याकरिता तसेच 2nd शिफ्ट मध्ये नविन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून प्रस्ताव सादर करण्यासाठी अधिसूचना प्रसिध्द केलेली आहे. संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम/प्रवेशक्षमता बदल करण्यासाठी त्यानुसार प्रस्ताव दिनांक ०६.१०.२०११ ते दिनांक ३१.१२.२०११ पर्यन्त ऑनलाईन सादर करण्याची मुदत दिलेली होती व त्यास परिषदेने दिनांक १५.०१.२०१२ व तद्नंतर दिनांक २५.०१.२०१२ आणि आता दि.३१.०१.२०१२ पर्यंत मुदतवाढ दिलेली होती. सदर कालावधीत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता प्रसिध्द केलेल्या अप्रूवल प्रोसेस हॅंडबुक नुसार पुढील १५ दिवसात शासनामार्फत संचालनालयाचे अभिप्राय/शिफारस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या विभागीय कार्यालयाकडे पाठविणे गरजेचे आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या सूचनेस अनुसरुन राज्यातील व्यवस्थापक मंडळ/संस्थेकडून सध्या अस्तित्वात असलेल्या संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम तसेच सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्याबाबत चे प्रस्ताव या कार्यालयास उपलब्ध होत आहेत. सध्या या कार्यालयात प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या विभागाशी संबंधित संस्थांची यादी सोबत जोडण्यात येत आहे. सदर प्रस्तावावर खाली नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन त्वरीत कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक आहे.



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

❖ या कार्यालयास यापुढे प्राप्त होणा-या प्रस्तावांची यादी आपल्याकडे वेळोवेळी पाठविण्यात येईल. विना-अनुदान तत्वावर नवीन तंत्रशिक्षण संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेशक्षमतेत बदल करण्यासाठीच्या प्रस्तावांकरिता आकारावयाचे नोंदणी/तपासणी शुल्क शासन निर्णय, क्र.सीटीसी-२०११/(प्र.क्र.४२/११)/तांशि-४, दि.२४ जानेवारी, २०१२ अन्वये सुधारीत करण्यात आलेले आहे. तरी आपल्या नियंत्रणाखालील संस्थेने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावानुसार आपल्या स्तरावर त्याची शहानिशा करुन त्याप्रमाणे संबंधित संस्थेकडून वरील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे नोंदणी/तपासणी शुल्क आकारण्यात यावे व प्रस्तावाची प्रत सदर संस्थेस संपर्क साधून त्वरित उपलब्ध करुन घ्यावी.

❖ ॲप्रुव्हल प्रोसेस हॅण्डबुकमधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अभ्यासक्रम व प्रस्ताव अपेक्षित आहेत.

१. सुरु असलेल्या संस्थेत अतिरिक्त अभ्यासक्रम किंवा प्रवेशक्षमता बदलबाबतचे प्रस्ताव.
२. सुरु असलेल्या संस्थेत सेकंड शिफ्टमध्ये नवीन अभ्यासक्रम/अतिरिक्त कार्यक्रम सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव.
३. सुरु असलेल्या संस्थेत सेकंड शिफ्टमध्ये नव्याने स्वतंत्र तांत्रिक संस्था सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव.

त्यानुसार राज्यातील अनेक संस्थांनी सेकंडशिफ्टमध्ये अतिरिक्त अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे प्रस्ताव सादर करतील असे अपेक्षित आहे. अनुक्रमांक-१ व २ साठी उपरोक्त शासन निर्णयामध्ये विहित केल्याप्रमाणे सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीचे व मंजूर अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्याच्या प्रस्तावाप्रमाणे संबंधित नोंदणी/तपासणी शुल्क आकारण्यात यावेत व अनुक्रमांक-३ साठी शासन निर्णयात विहित केल्याप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमाचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी नोंदणी शुल्क आकारण्यात यावे.

येथे असे स्पष्ट करण्यांत येते की, संस्थेने वरील तिन्ही प्रकारच्या प्रस्तावासाठी अर्ज सादर केले असल्यास सदर तिन्ही बाबींसाठी स्वतंत्रपणे विहित नोंदणी/तपासणी शुल्क आकारण्यांत यावेत.



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

❖ इंटिग्रेटेड कॅम्पस/टेक्निकल कॅम्पस योजने अंतर्गत नविन अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एमबीए/एमएमएस/एमसीए व पीजीडीएम पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या महाविद्यालयासाठी अर्ज केले असल्यास संबंधित संस्थेकडून नविन संस्थेसाठी नोंदणी/तपासणी शुल्क आकारण्यात यावे.

❖ ज्या संस्था तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थांची तपासणी केली जाणार नाही व संबंधित संस्थांच्या प्रस्तावावर शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे शिफारस केली जाणार नाही व त्यास संबंधित संस्था/ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहतील. याबाबत संबंधितांना आपल्यास्तरावर जाणीव करुन देण्यात यावी.

❖ आपल्या विभागातील सोबतच्या यादीत नमूद करण्यात आलेल्या संबंधित संस्थांमध्ये सुरु असलेल्या प्रत्येक अभ्यासक्रमासाठी तसेच प्रस्तावित केलेल्या नवीन अभ्यासक्रम किंवा सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढविण्याकरिता प्राप्त प्रस्तावास अनुसरुन मुंबई व पुणे विभागांतर्गत येणा-या संस्थांची सुनावणी खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे.

| विभाग | सुनावणीचा दिनांक व वेळ | सुनावणीचे ठिकाण |
|---|---|---|
| औरंगाबाद | ०९.०२.२०१२ सकाळी ११.०० वाजता | तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| अमरावती | ०९.०२.२०१२ सकाळी ११.०० वाजता | तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| नागपूर | ०९.०२.२०१२ सकाळी ११.०० वाजता | तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |

❖ संबंधीत संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून ॲप्रुअल प्रोसेसहँडबुकमध्ये विहित केलेल्या मानकानुसार उपलब्ध आहेत किंवा कसे? याबाबतची माहिती या संचालनालय स्तरावर आयोजित उपरोक्त सुनावणीच्या वेळी संबंधित संस्थेचे अध्यक्ष, सचिव किंवा प्राचार्य तसेच माहितीगार व्यक्तीसह उपस्थित रहावे. सुनावणीच्या वेळी संस्थेने नोंदणीशुल्क भरल्याबाबतची पुराव्याखातर पावतीची प्रत, प्राचार्य/ संचालक यांच्या नियुक्ती व त्यांच्या शैक्षणिक पात्रतेसंबंधीची माहिती, संस्थेतील सध्याची प्रवेशक्षमता, मंजूर व भरलेल्या शिक्षकांची संख्या, जागा, बांधकामाची सध्यस्थिती, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह, ॲमेनिटीज, इन्स्ट्रक्शनल व सर्क्युलेशन एरिया याबाबतची माहिती, कॉम्प्युटेशनल फॅसिलीटी, लायब्ररी फॅसिलीटी, ई जर्नल्स आणि इतर आवश्यक सोयी-सुविधांबाबतच्या माहिती व त्याअनुषंगाने आवश्यक कागदपत्रांसह तपासणीकरिता या संचालनालयात आणणे आवश्यक आहे. याबाबतचे निर्देश आपल्यामार्फत संबंधित संस्थांना देण्यात यावेत.



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional

येथे असे नमूद करण्यात येते की, संस्थेने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार अभ्यासक्रम इत्यादी व अभ्यासक्रमाचया मागणीचा क्रम बरोबर आहे किंवा कसे? याबाबत संस्थेने खात्री करुन घ्यावी व त्यात काही बदल असल्यास तसे सुनावणीच्या वेळी निदर्शनास आणावे.त्याचप्रमाणे संस्थेने परिषदेकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत व सदर प्रस्तावास अनुसरुन त्यासंबंधीचा अद्ययावत डिफिशिएन्सी रिपोर्ट सुनावणीच्या वेळी संबंधित संस्थांना सादर करणे आवश्यक राहिल तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेला सादर केलेल्या अर्जाची पार्ट-१व पार्ट-२, डिफिशिएन्सी रिपोर्ट,याची सॉफट कॉपी सोबत आणावी याबाबतची जाणीव संबंधित संस्थांना आपल्यास्तरावर करुन देण्यात यावी.

तसेच या कार्यालयास या पुढे प्राप्त होणा-या प्रस्तावाबाबत वेळोवेळी कळविण्यात येईल. तसेच नोदणी शुल्क भरल्याची पावती व मुळ दस्ताऐवज निर्धारित वेळापत्रकानुसार संस्थेने सादर न केल्यास अशा संस्थांना वाढीव वेळ दिला जाणार नाही. याची कल्पना संबंधित संस्थांना आपल्या स्तरावर देण्यात यावी.

( डॉ.सुभाष महाजन )
प्र.संचालक ,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.



Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional